पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/353/19
पुणे 1 दिनांक :-24/10/2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,

दादा शाम फौडेशन,10 साधु वासवाणी रोड,पुणे संचलित साधु वासवाणी गुरुकुल,गट नं-191,193, मांजरी खुर्द,ता.हवेली, जि.पुणे

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013

2.शासन निर्णय क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.730/एसए-2, दिनांक-27.8.2019

3.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांचे पत्र जा.क्र.शिउंस/प्राथ-202/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/2018-19/6363/ दिनांक-30.8.2019

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान शाळा प्राथमिक शाळेला जोडुन ते उच्च प्राथमिक इ.1 ली ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | दादा शाम फौडेशन,10 साधु वासवाणी रोड,पुणे | साधु वासवाणी गुरुकुल, गट नं-191,193, मांजरी खुर्द, ता.हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नविन शाळा (राज्यमंडळ) स्वंयअर्थसहाय्यित | प्राथमिक शाळेला जोडुन ते उच्च प्राथमिक इ.1 ली ते इ.8 वी | 2019-20 |

**अटी व शर्ती**

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3.संदर्भ क्रमांक-2 चे शासन निर्णयातील क्र.1 नूसार किमान 1 एकर सलग जागा शाळेसाठी योग्य असण्याचे अटीचे कायम पूर्ततेचे अधिन राहुन. तसेच जागेबाबत मा.न्यायालयीन वाद उत्पन्न झाल्यास मा.न्यायालयाचे होणा-या आदेशास अधिन राहुन परवानगी देणेत येत आहे.

4.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

5.संदर्भ क्रमांक 02 अन्वये सन-2019-20 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

6.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

7. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

8. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9. शासन निर्णय जा.क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.730/एसए-2, दिनांक-27.8.2019 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.

10. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

11. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

24.12.19

HEADMISTRESS
SADHU VASWANI GURUKUL, MANJRI KH., PUNE
UDISE NO.: 27250504726

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

Scanned with OKEN Scanner